॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २६ मे २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ३ रा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


✻ **सुविचार** ✻

स्वतःला आलेल्या अनुभवासारखा
दुसरा गुरु नाही

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### शिक्षणअवस्था

आयोगातून बाहेर
पडली आहे नीती
बंद पाडल्या शाळा
वर विचारता किती
खाजगी शाळांसाठी
माप सदैव झुकते
सरकारी धोरण सांगते
कोणाचे काय चुकते

## SPOT NEWS

### ‘लालपरी’चे तिकिटही वाढणार? : प्रताप सरनाईक

● **मुंबई** – मागील १० दिवसांत डिझेलच्या दरात ४ वेळा वाढ झाली आहे. त्यामुळे डिझेलच्या किमती प्रति लिटर ७ ते ८ रुपयांनी वाढल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्याचा फटका एसटी महामंडळालाही बसला आहे. सातत्याने दरवाढ होत असल्याचा फटका एसटी महामंडळाच्या उत्पन्नावरही होत असल्याचे प्रताप सरनाईकांनी सांगितले. त्याशिवाय एसटीच्या तिकिट दरवाढीवर प्रताप सरनाईकांनी स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. सध्या एसटी बस तिकिट दरवाढीचा विचार नाही. मात्र वारंवार डिझेलचे दर वाढले तर दरवाढ केल्याशिवाय पर्याय नाही, असे स्पष्ट संकेत प्रताप सरनाईकांनी दिले. सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी सेवा देणे हेच एसटीचे मुख्य उद्दिष्ट आहे. मात्र, ऑईल कंपन्यांकडून वारंवार होणारी दरवाढ आणि पुरवठ्यातील तूट यामुळे महामंडळाच्या उत्पन्नावर थेट परिणाम होत आहे. सध्या एसटी भाडेवाढीचा कोणताही विचार नाही. मात्र, जर डिझेलचे दर असेच सातत्याने वाढत राहिले, तर भविष्यात दरवाढ केल्याशिवाय महामंडळासमोर कोणताही पर्याय उरणार नाही, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले. एसटी महामंडळाचा गाडा सुरळीत चालवण्यासाठी दररोज १० लाख ८७ हजार लिटर डिझेलची आवश्यकता असते. हा पुरवठा कोणत्याही परिस्थितीत थांबू नये आणि दररोज प्रवास करणाऱ्या राज्यातील सुमारे ५५ लाख सर्वसामान्य प्रवाशांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महामंडळाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

# पाथर्डी पोलीस ठाण्यासमोर महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**पोलिस ठाण्यातच झालेल्या झडापडीत एकाचा मृत्यू । औरंगपूर येथील १६ जणांवर गुन्हा दाखल**

● **पाथर्डी । वीरभूमी** –
सामूहिक अत्याचार झाल्याची फिर्याद पोलिस घेत नसल्याच्या कारणावरून सोमवारी दुपारी पाथर्डी पोलीस ठाण्यासमोर एका महिलेने आपल्या मुलासह अंगावर ज्वलनशील द्रव्य ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी महिलेसोबत आलेल्या व्यक्तीचा जमिनीवर पडून मृत्यू झाला. विठ्ठल रावसाहेब खर्चन (वय ४५, रा. आखेगाव, ता. शेवगाव) असे मृताचे नाव आहे.

तालुक्यातील एका गावातील महिला आपला मुलगा व विठ्ठल खर्चन यांच्यासोबत सोमवारी दुपारी पोलिस स्टेशनला आली होती. आपणावर सामूहिक अत्याचार झाला असे तिचे म्हणणे होते. मात्र, पोलिसांनी फिर्याद घेण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप आहे. त्यामुळे पीडितेने अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून आत्महत्येचा प्रयत्न केला.

त्याच वेळी त्यांच्या समवेत आलेले विठ्ठल खर्चन हे अचानक पोलिस ठाण्याच्या दारातच कोसळले. बराच वेळ त्यांच्याकडे कोणाचे लक्ष गेले नाही. त्यानंतर त्यांना पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात आणले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.




या घटनेनंतर मयताच्या नातेवाइकांनी पाथर्डी पोलिस ठाण्याच्या आवारात गोंधळ घातला. पोलिसांवर गंभीर आरोप करीत उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली. फिर्यादी महिलेने आमच्या व्यक्तीचा पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करीत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह एका लोकप्रतिनिधींना दोषी धरले.

उपजिल्हा रुग्णालयाच्या दारात आक्रोश सुरू असतानाच पीडित महिला बेशुद्ध पडली. उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. मनीषा खेडकर व कर्मचाऱ्यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी दाखल केले. या घटनेनंतर अनेक संघटना उपजिल्हा रुग्णालयात जमा झाल्या होत्या. या घटनेचा तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, पीडित महिलेच्या फिर्यादीनुसार औरंगपूर येथील १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनकर गंगाधर किलबिले, प्रभाकर सुधाकर किलबिले, कृष्णा सुधाकर किलबिले, सारंगधर उत्तम किलबिले, अमोल मच्छिंद्र कोठे, निखिल माने, जयदत्त उत्तम किलबिले, अभिषेक दिलीप किलबिले, दिलीप तुकाराम किलबिले, भीमराव ज्ञानदेव किलबिले, ईश्वर बापूसाहेब देशमुख, सुभाष गोविंद किलबिले, आनंद भाऊसाहेब कासूळे, मनीषा सुधाकर किलबिले व तिचे वडील यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

आपणावर दोघांनी सामूहिक अत्याचार केला व त्यांना इतरांनी मदत केली, अशी महिलेची फिर्याद आहे. घराच्या बांधकामासाठी ठेवलेले तीन लाख रुपये चोरी केल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे.

### पोलिस अधिकारी यांच्यावर कारवाई करा

■ दरम्यान वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन चव्हाण यांनी पाथर्डी पोलिस ठाणे गाठत या सर्व घटनेला जबाबदार असलेल्या पाथर्डीचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्यावर जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत मृतदेहावर अंत्यसंस्कार केले जाणार नसल्याची भूमिका घेतल्याने प्रकरण चांगलेच तापणार असल्याचे दिसत आहे.

# पेट्रोल-डिझेलनंतर सीएनजीमधील दरवाढीचाही चौकार

● **मुंबई । वीरभूमी** –
पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीनंतर मंगळवारी (२६ मे) देशभरात सीएनजीच्या दरात २ रुपयांनी वाढ करण्यात आल्याने नागरिकांना मोठा फटका बसणार आहे. मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे आणि जागतिक बाजारातील घडामोडींमुळे इंधन कंपन्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे गेल्या ११ दिवसांत चौथ्यांदा ही दरवाढ करण्यात आली असून यामुळे रिक्षा, टॅक्सीसह सीएनजी वाहन चालक आणि प्रवाशांना याचा मोठा फटका बसणार आहे. मंगळवारच्या नव्या दरानुसार, मुंबईत ८१ रुपये प्रति किलो असा दर आहे. तर पुण्यात ९२.५० प्रति किलो असा आहे.

सीएनजीचे दर वाढल्यामुळे मुंबई आणि पुण्यातील ऑटो रिक्षा, टॅक्सी आणि कॅब चालकांकडून भाडेवाढीची मागणी करण्यात येत आहे. आधीच पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीमुळे संतापलेल्या नागरिकांचे सीएनजीच्या दरात झालेल्या वाढीमुळे आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे.

सीएनजी दरवाढीवर काँग्रेसने पुन्हा हल्लाबोल केला आहे. ‘महागाई मॅन मोदींचा चाबूक पुन्हा एकदा जनतेवर. सीएनजी २ रुपयांनी महाग झाला आहे. गेल्या ११ दिवसांत सीएनजीच्या दरात ६ रुपयांची वाढ झाली आहे. नरेंद्र मोदी आपल्या श्रीमंत मित्रांसाठी जनतेला लुटत आहेत.’ असे म्हणत त्यांनी टीका केली आहे.

गेल्या १० दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेली ही चौथी दरवाढ आहे. एकूणच, गेल्या १० दिवसांत पेट्रोल प्रति लिटर ७ रुपये ३५ पैसे आणि डिझेल प्रति लिटर ७ रुपये ५३ पैशांनी महाग झाले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

**गत वर्षात ५५ बालविवाह रोखले । १५ कुटुंबांविरोधात एफआयआर दाखल**

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करत महिला व बाल विकास विभागाकडून बालविवाह मुक्त भारत अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत बालविवाह प्रतिबंध कायद्याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत असून, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून एकूण ५५ बालविवाह रोखण्यात यश आले आहे. तसेच बालविवाह प्रकरणांमध्ये १५ कुटुंबांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी दिली.

बालविवाह विरोधी जनजागृतीसाठी पथनाट्य, चिकटपत्रके, पोस्टर्स आदी विविध माध्यमांचा उपयोग करण्यात येत असून, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांच्या नोंदी, जनजागृती उपक्रम तसेच बालविवाह विरोधी शपथ आदी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात बालविवाह होऊ नयेत, यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांकडून शपथ घेण्यात आली आहे.

महाराष्ट्रात कुठेही बालविवाह होत असल्यास नागरिकांनी तत्काळ १०९८ हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी. तसेच याबाबत कोणतीही तक्रार असल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष तसेच जिल्हा चाइल्ड हेल्पलाइन १०९८ केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. कदम यांनी केले आहे.

# शेवगाव तालुक्यात डिझेल टंचाई; नांगरटी ठप्प

**खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकरी संकटात । स्वाभिमानी संघटनेची प्रशासनाकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी**

● **शेवगाव । वीरभूमी** –
खरीप हंगाम तोंडावर असताना शेवगाव तालुक्यात डिझेल टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले असून, नांगरटीच्या हंगामात शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. पेट्रोल पंपांवर तासन्तास रांगा लावूनही डिझेल मिळत नसल्याने शेतीची अत्यावश्यक कामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मे महिना हा मशागतीसाठी अत्यंत महत्त्वाचा कालावधी मानला जातो. या काळात नांगरट, रोटाव्हेटर आदी यंत्रांच्या सहाय्याने जमीन भुसभुशीत करून पेरणीसाठी तयार केली जाते. मात्र यंदा डिझेलच्या अभावामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. वेळेवर मशागत न झाल्यास जमिनीतील ओलावा टिकत नाही, तण नियंत्रण होत नाही आणि पिकांची वाढ खुंटते. परिणामी संपूर्ण हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

यंदा दुष्काळाचे सावट असताना ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरत आहे. डिझेल नसेल तर शेती करायची कशी? असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. शेतात काम करावे की पंपावर थांबावे, हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर उभा ठाकला आहे.

दरम्यान, पुढील ८ ते १५ दिवसांत पावसाळा सुरू होण्याची शक्यता असताना वेळेवर नांगरट न झाल्यास शेकडो एकर जमीन पडीत राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटना चे दत्तात्रय फुंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

फक्त आश्वासने नकोत, शेतकऱ्यांना वेळेवर डिझेल मिळाले पाहिजे. अन्यथा परिस्थिती गंभीर होईल, असा इशारा देत तहसीलदार, जिल्हाधिकारी आणि जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना डिझेल पुरवठा सुरळीत करण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्वाभिमानी संघटना व शेतकऱ्यांनी दिला आहे.



SPOT NEWS

## वसतिगृहांसाठी सैनिकांच्या पाल्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
जिल्ह्यातील अहिल्यानगर शहर, श्रीगोंदा व कोपरगाव येथील सैनिकांच्या मुला-मुलींच्या वसतिगृहांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, दि. ३० जून २०२६ पर्यंत प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे. अहिल्यानगर येथे सैनिक मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वसतिगृह नगर कॉलेजसमोर स्थित असून, श्रीगोंदा येथे शासकीय आरोग्य केंद्राशेजारी सैनिक मुलांचे वसतिगृह कार्यरत आहे. तसेच कोपरगाव येथे खंडोबा मंदिराशेजारी सैनिक मुलांचे वसतिगृह सुरू आहे. या वसतिगृहांमध्ये अंघोळीसाठी गरम पाणी, स्वतंत्र अभ्यासिका, विविध खेळांचे साहित्य तसेच सुसज्ज मैदान उपलब्ध आहे. वेळोवेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करण्यात येते. अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहांच्या अधीक्षकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या वसतिगृहांमध्ये इयत्ता अकरावी ते पदव्युत्तर शिक्षण तसेच औद्योगिक प्रशिक्षण व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिक व सेवेत असलेल्या सैनिकांच्या पाल्यांना सवलतीच्या दरात प्रवेश दिला जाणार आहे. युद्धविधवा तसेच दिव्यांग सैनिकांच्या पाल्यांना विनामूल्य प्राधान्याने प्रवेश देण्यात येणार आहे. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी दि. ०१ जुलै २०२६ रोजी प्रवेश निश्चितीसाठी उपस्थित राहावे, असेही कळविण्यात आले आहे.



# रस्ता रुंदीकरणात ऐतिहासिक काशीबारव सुरक्षित

**वारसा संवर्धकांच्या प्रयत्नांना यश । मांडवगण-श्रीगोंदा मार्गावरील कामात बारवेला धक्का न लावण्याचा निर्णय**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**
मांडवगण-श्रीगोंदा रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये धोक्यात आलेली ऐतिहासिक काशीबारव अखेर सुरक्षित राहणार असल्याची दिलासादायक माहिती समोर आली आहे. बारव परिसरात पुन्हा खोदकाम सुरू झाले असले तरी पुरातन वारशाला कोणतीही हानी न पोहोचवता रस्त्याचे काम करण्यात येणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. ही माहिती प्रत्यक्ष स्थळ पाहणीदरम्यान शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांना देण्यात आली.

काशीबारव आणि परिसरातील जुनी चिंचेची झाडे वाचवण्यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून सामाजिक माध्यमे, प्रिंट मिडिया आणि विविध स्तरांवर जनजागृती मोहीम सुरू होती. स्थानिक शेतकऱ्यांनीही चिंचेच्या झाडांच्या संरक्षणासाठी मोठा संघर्ष उभारला होता. अखेर या प्रयत्नांना यश मिळाले असून बारवेसह झाडेही सुरक्षित राहणार आहेत.

या ऐतिहासिक वारशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन व शिवदुर्ग वारसा संवर्धन समिती यांनी गेल्या वर्षभरात विविध शासकीय कार्यालयांशी सातत्याने पत्रव्यवहार केला.





आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या माध्यमातूनही हा विषय प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.

दरम्यान, संबंधित अधिकारी व ठेकेदारांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून शिलालेख आणि बारवेची रचना तपासली. त्यानंतर बारवेला कोणतीही हानी होणार नाही, याची खात्री करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अपघात टाळण्यासाठी बारवेच्या कडेला संरक्षक कठडा उभारण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

महादजी शिंदे यांच्या घराण्याच्या वारशाशी संबंधित असलेली ही ऐतिहासिक काशीबारव सुरक्षित ठेवल्याबद्दल इतिहासप्रेमी व वारसा संवर्धकांच्या वतीने श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते, अहिल्यानगर जिल्हाधिकारी, श्रीगोंदा तहसीलदार, पुरातत्त्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांचे आभार व्यक्त करण्यात आले.


पानिपत वीरांचा वारसा धोक्यात, 'काशीबारव वाचवा'ची जोरदार मागणी

### वीरभूमीच्या वृत्तानंतर मिळाली गती

■ दैनिक वीरभूमीमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानंतर या विषयाला मोठी गती मिळाली. जनजागृतीच्या शक्तीमुळे एक महत्त्वाचा ऐतिहासिक वारसा वाचला, अशी भावना इतिहासप्रेमींनी व्यक्त केली.

## सैनिक बँकेतील प्रशासकाच्या कार्यपद्धतीवर अन्याय निर्मूलन सेवा समितीचा आक्षेप

**विविध नियुक्त्या, मुदतवाढ, बदली प्रक्रिया, आर्थिक व्यवहारामध्ये अनियमिततेचा आरोप**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकचे प्रशासक यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप करत त्यांची निष्पक्ष चौकशी करून तात्काळ बदली करण्यात यावी तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची बढती देऊ नये, अशी मागणी सहकार आयुक्त व जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे अन्याय निर्मूलन सेवा समितीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी या प्रकरणी कारवाई न झाल्यास ६ जून रोजी संघटनेच्या वतीने जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सदर अर्जात बँकेतील विविध नियुक्त्या, मुदतवाढ, बदली प्रक्रिया, आर्थिक व्यवहार आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. गणेश सुपेकर यांनी मुदत संपल्यानंतरही बँकेच्या लेटरहेडचा वापर करून शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार केल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. तसेच, त्यांच्याविरोधात तक्रारी दाखल असतानाही त्यांना पुन्हा सेवेत घेतल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

अर्जामध्ये काही कर्मचाऱ्यांना सहकार खात्याची पूर्वपरवानगी न घेता मुदतवाढ देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, बँकेतील भरती प्रक्रियेत आर्थिक व्यवहार व पक्षपातीपणाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. कर्जत शाखेतील कर्मचारी हिम्मत लाड यांना नियमबाह्य पद्धतीने पुन्हा सेवेत नियुक्त केल्याचा तसेच शिपाई राजू करंजुले यांच्या बदलीमागे विशिष्ट व्यक्तींना लाभ मिळवून देण्याचा हेतू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय, बँकेचे सीसीटिव्ही फुटेज अनधिकृतरीत्या मोबाईलमध्ये ठेवण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करत माहिती सुरक्षेचा भंग झाल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी करण्यात आलेल्या नियुक्त्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले असून, काही निर्णय आर्थिक तडजोडीतून घेतल्याचा गंभीर संशय अर्जदारांनी व्यक्त केला आहे.


अर्जदारांनी असा आरोप केला आहे की, प्रशासक विकास जाधव यांनी बँकेचा विकास करण्यापेक्षा स्वतःचा विकास करण्यात अधिक रस घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासकांचा विकास आधी की बँकेचा? असा सवाल आता सभासदांमधून उपस्थित केला जात आहे. प्रशासक जाधव यांच्या मालमत्ता, आर्थिक व्यवहार, न्यायालयीन खर्च तसेच बँकेतील कथित बोगस बिले व अनियमित खर्चांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही अर्जात करण्यात आली आहे. संबंधित निर्णयांमध्ये काही व्यक्तींच्या प्रभावाखाली कामकाज झाल्याचा संशय व्यक्त करत कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) तपासण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, बँकेतील प्रशासकीय अराजकता वाढत असून नियमबाह्य पद्धतीने कामकाज सुरू असल्याचा आरोप अर्जदारांनी केला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत मका खरेदीची थकीत रक्कम तातडीने द्या

**आ. विवेकभैय्या कोल्हे यांची मुख्यमंत्र्यांसह पणनमंत्र्यांकडे मागणी**

**● कोपरगाव । वीरभूमी–**
महाराष्ट्र शासनाने सन २०२५-२६ मध्ये पणन महासंघमार्फत सुरू केलेल्या भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत हमीभावाने खरेदी केलेल्या मका पिकाची थकीत रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी, अशी मागणी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



सदर दिलेल्या निवेदनात आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या धोरणानुसार शेती पिकांचे हमीभाव निश्चित करण्यात आले असून मकासाठी प्रतिक्विंटल २४०० रुपये हमीभाव शासनाने जाहीर केला आहे. राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई मार्फत भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत ७ मार्च २०२६ पर्यंत खरेदी करण्यात आलेल्या मक्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली आहे. मात्र ८ मार्च ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत केंद्र व राज्य शासनामार्फत हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या मक्याचे पैसे अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत एका केंद्रावर ८ मार्च ते ३० एप्रिल पासून २२८ शेतकऱ्यांची तब्बल १ कोटी ६२ लाख ५६ हजार ४०० रुपयांची रक्कम प्रलंबित असल्याचेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे संबंधित शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून खरीप हंगामाच्या पूर्वतयारीवर त्याचा परिणाम होत आहे.

सध्या राज्यात खरीप हंगामाच्या मशागती सुरू असून शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते व इतर शेती साहित्य खरेदीसाठी पैशांची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या मक्याची प्रलंबित देयके तात्काळ संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# विद्यालय, मंदिर व दर्गा परिसरातील दारुअड्ड्यावर कारवाईची मागणी

**आठ दिवसांत कारवाई न झाल्यास निघोज पोलीस स्टेशनसमोर सत्याग्रह आंदोलनाचा इशारा**

**● निघोज । वीरभूमी–**
पारनेर तालुक्यातील निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मळगंगा माध्यमिक विद्यालय, मोरेश्वर मंदिर आणि दर्गा परिसरात सुरू असलेल्या कथित दारुअड्ड्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा विविध सामाजिक संघटना व ग्रामस्थांनी दिला आहे.

यासंदर्भात शिवबा संघटना, धर्मवीर प्रतिष्ठान, पत्रकार संघ, व्यापारी असोसिएशन, आजी-माजी सैनिक संघटना, शिवबा दुर्गसंवर्धन समिती, स्कूल कमिटी पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने निघोज पोलीस बिट विभागाचे पीएसआय कोळपे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ, शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, हिंदवी शिक्षण संस्थेचे सचिव शिवाजीराव वराळ, मुलिका देवी स्कूल कमिटीचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, सैनिक संघटनेचे पदाधिकारी मेजर विकास वराळ, मेजर सत्यवान लंके, दुर्ग संवर्धन समितीचे अध्यक्ष राजूभाऊ लाळगे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, बाबासाहेब कवाद, निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड. बाळासाहेब लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविशेठ रणसिंग, संतोष देशमुख, रामा ढवण, महादू लामखडे, दत्ता चौधरी, स्वप्नील जाधव आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून मळगंगा विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोरेश्वर मंदिर आणि दर्गा परिसरात खुलेआम दारू विक्री सुरू आहे. वारंवार तक्रारी करूनही पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या परिसरात शाळा, मंदिर, दर्गा तसेच मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असल्याने दारू पिऊन येणाऱ्या व्यक्तींकडून विद्यार्थ्यांना, महिला भगिनींना, शिक्षकांना आणि भाविकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी दारू पिणाऱ्यांची वर्दळ सुरू असल्याने शिवीगाळ, आरडाओरडा आणि असभ्य वर्तनामुळे परिसरातील वातावरण दूषित होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



ग्रामस्थांनी पोलीस निरीक्षक खेडेकर तसेच उपनिरीक्षक खंडागळे यांनाही निवेदन देऊन सविस्तर माहिती दिली असून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अहमदनगर येथे भेट घेऊनही याबाबत निवेदन देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, येत्या आठ दिवसांत संबंधित दारुअड्ड्यावर कायमस्वरूपी कारवाई न झाल्यास निघोज पोलीस स्टेशनसमोर बैठा सत्याग्रह आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

SPOT NEWS

## राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**अहिल्यानगर । वीरभूमी–** मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानच्या (अहिल्यानगर) वतीने राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षा २०२५–२६ चा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून मराठी भाषेची गोडी निर्माण व्हावी तसेच त्यांच्या भाषिक उपयोजन कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने पाठ्यपुस्तक व व्याकरणावर आधारित ही राज्यस्तरीय परीक्षा आयोजित करण्यात आली होती. हा सोहळा उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. फिरोदिया म्हणाले की, मराठी राजभाषा ही महाराष्ट्राची ज्ञानभाषा होईल. मराठी भाषेने राज्याला समृध्द केले व या भाषेने अनेकांना समृध्द केले. अल्प कालावधीतच मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानचे कार्य अत्यंत उल्लेखनीय ठरले असून, महाराष्ट्रात मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा सुलोचना क्षीरसागर व त्यांच्या संपूर्ण टीमने अत्यंत उत्कृष्ट व नियोजनबद्ध केले असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता व आकर्षण निर्माण होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये आयोजित या परीक्षेला तब्बल दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, त्यापैकी सुमारे ७०० गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. गर्दीने खचाखच भरलेल्या माऊली सभागृहाबाबत उल्लेख करताना फिरोदिया यांनी पुढील कार्यक्रमासाठी स्टेडियम घ्यावे लागेल अशी मिश्किल टिप्पणीही केली. या कार्यक्रमास महापालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, डॉ. विजय दळवी, नितीन शेलार, नारायण खरात, रवींद्रजी काळे, शिक्षक लहू बोराटे, मराठी अध्यापक संघाचे रंगनाथ सुंबे, कवी ज्ञानदेव उंडे, महेश डाळिंबकर, बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुनील दानवे, सुरज घाटविसावे, कैलास गुंजाळ, मुख्याध्यापक सुभाष येवले, केंद्रप्रमुख अरुण पालवे, प्राचार्या संगीता पाठक, मुख्याध्यापिका वर्षा शेलार, प्रसाद शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## एआयएफ अंतर्गत कृषी ड्रोनसाठी जिल्हा सहकारी बँकांमार्फत कर्जयोजना सुरु करा

**अहिल्यानगर । वीरभूमी–** जिल्हा बँकांमार्फत ग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड (एआयएफ) अंतर्गत कृषी ड्रोनसाठी विशेष कर्जयोजना सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रभाकरम फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली. या मागणीचे निवेदन फाऊंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर व निखिल कवडे यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले. यावेळी कृषीमंत्री भरणे यांनी या मागणीबाबत सकारात्मक भूमिका दर्शविली. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना कमी खर्चात आणि अधिक कार्यक्षम पद्धतीने फवारणी सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी कृषी ड्रोनची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः युवक आणि ग्रामीण उद्योजकांना कृषी ड्रोन व्यवसायासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी सुलभ कर्जपुरवठा आवश्यक असल्याचे मत फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आले. कृषी ड्रोन क्षेत्राला चालना मिळाल्यास शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# गौमातेला राष्ट्रीय पशू घोषित करा

### सामाजिक सलोखा जपण्यासाठी पाथर्डीत मुस्लिम समाजाचा पुढाकार । तहसीलदारांना दिले निवेदन

**पाथर्डी । वीरभूमी –** आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक भान जपत समाजात शांतता, बंधुता आणि परस्पर आदराची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने पाथर्डी तालुक्यात यापुढे कुठेही गोमाता व गोवंशाची कत्तल होणार नाही, तसेच असा प्रकार घडल्यास त्याला मुस्लिम समाज कधीही पाठीशी घालणार नाही, अशी भूमिका पाथर्डी तालुका मुस्लिम समाजाच्या वतीने स्पष्ट करण्यात आली. यासोबतच गौमातेला राष्ट्रीय पशू घोषित करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी तहसीलदार आणि पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.



विविध समाजघटकांमध्ये सलोखा निर्माण करण्याच्या दृष्टीने मुस्लिम समाजाने घेतलेल्या या पुढाकाराची शहरात व्यापक चर्चा होत असून, या भूमिकेचे अनेक स्तरांतून स्वागत केले जात आहे.

यावेळी पाथर्डी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नासीर शहानवाज शेख यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, गाय ही भारतीय संस्कृती, परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. गौमातेला राष्ट्रीय पशूचा दर्जा दिल्यास गोवंश संरक्षणाची जबाबदारी शासनावर अधिक प्रभावीपणे येईल. गोवंशाबाबत बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. मात्र, कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान कोणत्याही निष्पाप नागरिकाला, व्यापाऱ्याला किंवा समाजातील घटकांना विनाकारण त्रास होऊ नये, हाच सामाजिक सुव्यवस्थेचा आणि न्यायव्यवस्थेचा खरा मार्ग आहे.

निवेदनाद्वारे गोसंवर्धन, सामाजिक ऐक्य आणि कायद्याचा सन्मान राखत शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली. समाजात सौहार्द टिकवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरजही उपस्थितांनी व्यक्त केली.

या प्रसंगी तालुका काँग्रेस अध्यक्ष नासीर शहानवाज शेख, शमाली पठाण, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष जुनेद पठाण, मुन्नाभाई खलिफा, इजाज शेख, आरिफ कुरेशी, समीर शेख, आसिफ शेख, ईश्तियाक चौधरी, उस्मान बादशाह शेख, जानमोहम्मद पटेल, अजीज शेख, सुनील दौंड, सरफराज चौधरी, आनंद जगन्नाथ सानप, अमजद आतार, वसीम मणियार, जावेद पिंजारी, अकबर कलंदर शेख, सादिक सय्यद यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहसील कार्यालयात निवेदन सादर करताना सामाजिक ऐक्य, शांतता आणि संविधानिक मूल्यांचे पालन करण्याचा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे पाथर्डी तालुक्यात सामाजिक सलोखा अधिक बळकट होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## डिझेल पुरवठा सुरळीत करण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहिल्यानगर । वीरभूमी–** जिल्ह्यात निर्माण झालेल्या डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांची शेती मशागतीची कामे ठप्प होत असल्याने शेतकऱ्यांना तात्काळ पुरेशा प्रमाणात डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्यासह अशोक आंधळे, संतोष वाबळे, जिल्हा संपर्कप्रमुख अरुण बेलकर, जिल्हाप्रमुख सुभाष करंजुले, तालुका सचिव अन्सार पटेल, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब वाळुंज, राजेंद्र कर्डिले उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, सध्या जिल्ह्यात डिझेलचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून त्याचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होत आहे. ट्रॅक्टर, पंप, शेती अवजारे व इतर यंत्रसामग्रीसाठी डिझेल अत्यावश्यक असताना अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा साठा उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. काही ठिकाणी मर्यादित प्रमाणात डिझेल दिले जात असून कॅनमध्ये डिझेल देण्यासही नकार दिला जात आहे. याशिवाय ट्रॅक्टरसाठी डिझेल घेताना सातबारा उतारा किंवा ट्रॅक्टरचे आरसी बुक मागितले जात असल्याने शेतकऱ्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नांगरणी, पेरणी, फवारणी, मशागत यांसारखी महत्त्वाची शेतीकामे वेळेत होत नसून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

आधीच नैसर्गिक संकटे, अवकाळी पाऊस आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे शेतकरी अडचणीत असताना डिझेल टंचाईमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यामुळे जिल्ह्यासह राज्यातील सर्व पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांना आवश्यक त्या प्रमाणात डिझेल उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

## ‘मिशन स्पोकन इंग्लिश कोर्स’ पुस्तकाचे प्रकाशन

### हेमंत मंडलिक यांच्या पुस्तकातून बेसिक ते ॲडव्हान्स इंग्रजी ग्रामर व रायटिंग स्किल

**अकोले । वीरभूमी–** गेल्या अकरा वर्षांपासून ऑनलाईन आणि ऑफलाईन माध्यमातून इंग्रजी विषयाची गुणवत्ता वाढविणाऱ्या क्लास म्हणून ख्याती मिळवलेल्या तसेच भारतासह परदेशातही इंग्रजी विषय शिकवणारे हेमंत मंडलिक सर यांच्या ‘मिशन स्पोकन इंग्लिश कोर्स’ या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ उत्साहात संपन्न झाला.




अगस्ती महाविद्यालयाचे इंग्रजी विभागाचे प्राध्यापक संजय पगारे आणि इंग्रजी विषयाचे तज्ञ शिक्षक रामनाथ काकड यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी प्रास्ताविक व स्वागत करताना पुस्तकाचे लेखक हेमंत मंडलिक यांनी २०१५ पासून आजपर्यंतच्या क्लासच्या प्रवासाचा आढावा घेतला. तसेच या पुस्तकामध्ये बेसिक ते ॲडव्हान्स इंग्रजी ग्रामर, स्पोकन इंग्लिश आणि रायटिंग स्किलचा समावेश करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

इंग्रजी विषयाचे तज्ञ शिक्षक रामनाथ काकड यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना इंग्रजी विषयाचे महत्त्व पटवून दिले. तर प्रा. संजय पगारे यांनी स्पोकन इंग्लिश कसे सुधारावे आणि त्याचे आजच्या काळातील महत्त्व काय आहे, हे आपल्या अनुभवातून स्पष्ट केले.

याप्रसंगी क्लासमध्ये शिक्षण घेतलेल्या दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ‘मिशन स्पोकन इंग्लिश कोर्स’ हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास रामनाथ मंडलिक, सौ. शशिकला मंडलिक, इंग्रजी विषयाचे तज्ञ शिक्षक घनश्याम माने, गुलाबराव मंडलिक, त्रिभुवन सर, माजी प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, गणेश जोशी, मीनानाथ खराटे, माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक, माजी मुख्याध्यापक बाळासाहेब बनकर, डॉ. गणेश नवले, भाऊसाहेब कासार, सौ. संगीता मंडलिक, सुजित नवले तसेच माळीझाप येथील ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अळकुटीत वृद्ध दांपत्याला जीवे मारण्याचा प्रयत्न; पोलिसांच्या भूमिकेविरोधात संताप

### दगडफेक, शिवीगाळ आणि धमक्यांचा आरोप । तातडीच्या कारवाईसाठी पारनेर पोलिसांना निवेदन

**पारनेर । वीरभूमी–** पारनेर तालुक्यातील अळकुटी येथे एका ६६ वर्षीय वृद्ध महिलेच्या घरावर दगडफेक करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी संशयित आरोपीवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी नगरसेवक अमित जाधव आणि सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र नगरे यांच्या नेतृत्वाखाली पारनेर पोलीस प्रशासनाला लेखी निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, अळकुटी येथील रहिवासी इंदुबाई सुदाम शिंदे (वय ६६) या त्यांच्या अर्धांगवायूग्रस्त पतीसह गावात वास्तव्यास आहेत. त्यांचे कुटुंब गेल्या पाच पिढ्यांपासून या घरात राहत असून, शेजारी बबन पांडुरंग शिरोळे हे घर खाली करण्यासाठी सातत्याने मानसिक व शारीरिक त्रास देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

घर खाली केले नाही तर जीवे मारू, अशी धमकी देत संशयिताकडून वारंवार जातीवाचक शिवीगाळ केली जात असल्याचेही पीडित महिलेने तक्रारीत नमूद केले आहे.

रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास संशयित बबन शिरोळे याने इंदुबाई यांच्या घरावर जोरदार दगडफेक केल्याचा आरोप आहे. दगडफेकीमुळे घाबरलेल्या इंदुबाई घराबाहेर आल्या असता त्यांच्यावरही दगडफेक करण्यात आली. तसेच जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेनंतर इंदुबाई शिंदे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, पोलिसांनी या प्रकरणाची योग्य दखल घेतली नसल्याचा गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. घटना घडून चार दिवस उलटूनही घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आलेला नसून, उलट पीडित महिलेलाच धमकावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सध्या स्थानिक गावगुंड आणि पोलिस प्रशासन या दोन्हींकडून मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची व्यथा पीडित महिलेने मांडली आहे. या घटनेमुळे पारनेर तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक संघटना पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभ्या राहिल्या आहेत.



पोलीस प्रशासनाला निवेदन देताना स्वाभिमान रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष भागाभाऊ सोनवणे, भीम आर्मीचे तालुकाध्यक्ष संजयभाऊ सोनवणे, वैभव जाधव, रणजीत शिंदे, दीपक साळवे, श्रीकांत जाधव, अमोल लाड, सुदाम शिंदे, विठ्ठल शिंदे, अशोक शिंदे, प्रकाश शिंदे, संतोष शिंदे, बाळासाहेब गायकवाड, भय्या आढाव, शीतल शिंदे, रंजना आढाव, नम्रता शिंदे, तुषार आढाव, विशाल आढाव यांच्यासह अनेक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रकरणात पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# कामात टाळाटाळ करणाऱ्यांना पाठीशी घालू नका

## आ. आशुतोष काळे यांच्या महावितरणला सूचना

**कोपरगाव । वीरभूमी-**

मतदार संघात वीज ग्राहकांच्या समस्या वेळेवर सुटत नाही त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांसह छोटे-मोठे व्यवसायिक आणि शेतकऱ्यांना देखील त्याचा फटका बसत असून याला जबाबदार महावितरणचे काही कामचुकार कर्मचारी आणि अधिकारी आहेत. त्यामुळे यापुढे वीज ग्राहकांच्या समस्यांचा तातडीने कशा सोडविता येतील याची काळजी घ्या आणि कामात टाळाटाळ करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नका अशा स्पष्ट सूचना आमदार आशुतोष काळे यांनी महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या.

आ.आशुतोष काळे यांनी सोमवार (दि.२५) रोजी मतदार संघातील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत शेतकऱ्यांनी आ.आशुतोष काळे यांच्यापुढे आपल्या अडचणी मांडल्या त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, शुक्रवार (दि.२२) रोजी झालेल्या वादळी वाऱ्याची कोपरगाव तालुक्यासह संपूर्ण मतदारसंघाला मोठी झळ बसली आहे. अनेक भागात झाडे वीज वाहिन्यांवर पडली असल्याने विजेचे खांब वाकले असून वीज वाहिन्या तुटल्या आहे. मात्र तीन दिवस उलटूनही तालुक्यातील काही गावांत तुटलेल्या वीज वाहिन्या जोडण्याचे आणि विजेचे खांब सरळ करण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही हि कामे तातडीने पूर्ण करा. शेतकऱ्यांना शेती पंपासाठी सुरळीत वीज पुरवठा करा. डीपी बसवण्याचे व जोडण्याचे, नवीन वीज वाहिनी टाकण्याचे, एल टी लाईन जोडण्याचे काम आणि वीज वाहिन्यांच्या संपर्कात येणारी झाडे छाटण्याची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी गरज पडल्यास मेन्टनसचे काम करणाऱ्या ठेकेदाराला मजुरांची संख्या वाढवायला सांगा. चांदेकसारे येथे होणाऱ्या सबस्टेशनचे काम त्वरित सुरु करून शेतकऱ्यांना उच्च दाबाने वीज पुरवठा होण्यासाठी काम लवकर पूर्ण करा.

सोलर योजनेचा मतदार संघातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कसा फायदा होईल यासाठी विशेष योजना राबवावी. गरज असल्यास नवीन सर्व्हे करून पात्र शेतकऱ्यांना फायदा करून द्या. सौर कृषी पंप योजनेच्या एजन्सीच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवा सोलर प्लांट योजनेच्या माध्यमातून जर शेतकऱ्याची फसवणूक झाली तर त्या अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही. कनिष्ठ अधिकारी वरिष्ठांना चुकीची माहिती देत असल्याचे निदर्शनास आले असून अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करून वीज ग्राहकांच्या अडचणी प्राधान्याने सोडविण्याच्या सूचना



आमदार आशुतोष काळे यांनी या बैठकीत महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या. तालुक्यातील ११ गावातील सोलर प्लांटच्या कामांचा आढावा घेतांना सोलर प्लांटचे काम प्रगतीपथावर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले त्याबाबत आ.आशुतोष काळे यांनी समाधान व्यक्त केले. या बैठकीला कोपरगाव ग्रामीण उपकार्यकारी अभियंता, राहाता ग्रामीण उप कार्यकारी अभियंता, तालुक्यातील विविध विभागीय अभियंता, विविध गावचे सरपंच आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संतोषशेठ रसाळ यांचे कार्य समाजाभिमुख

## भगवान फुलसुंदर । मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या कामाचे कौतुक

**निघोज । वीरभूमी-**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्यक्षम विश्वस्त, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पाठबळ देणारे कांदा व्यावसायिक तसेच निघोज व परिसराच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणारे संतोषशेठ रसाळ यांचे कार्य समाजाभिमुख व गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन अहमदनगर शहराचे प्रथम महापौर भगवान फुलसुंदर यांनी केले.

भगवान फुलसुंदर व त्यांच्या कुटुंबीयांनी राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. त्यानंतर त्यांनी शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिका व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट कार्यालयाला भेट दिली. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पारनेर तालुका उपाध्यक्ष रमेशशेठ वरखडे यांच्या हस्ते फुलसुंदर यांचा सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी फुलसुंदर यांच्या पत्नी नगरसेविका सुनिता फुलसुंदर, नक्षत्र लॉन व प्रभा हॉटेलचे संचालक अवधूत फुलसुंदर तसेच कुटुंबीय उपस्थित होते.

यावेळी बोलताना भगवान फुलसुंदर म्हणाले की, निघोज आणि परिसराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला असून गावातील एकोपा, ज्येष्ठांचे मार्गदर्शन, मळगंगा मातेचा आशीर्वाद आणि जगप्रसिद्ध रांजणखळगे हे पर्यटनस्थळ यामुळे या भागाची ओळख राज्यभर निर्माण झाली आहे. कुकडी डावा कालव्यामुळे हा परिसर समृद्ध झाला असून येथील शेतकरी कष्टकरी आहेत. मात्र, शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आहे. असे असले तरी येथील सहकारी संस्था, व्यापारी आणि व्यावसायिक शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत असल्याने हा परिसर विकासाभिमुख ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संतोषशेठ रसाळ, रमेशशेठ वरखडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून या भागात लोकाभिमुख कामे सुरू असून मळगंगा मातेच्या पावन भूमीचा लौकिक राज्यभर असल्याचेही त्यांनी सांगितले.

# दारूच्या नशेत ११२ वर खोटे कॉल करून पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या वाघापूरच्या तरुणावर गुन्हा दाखल

## पत्नी व मेव्हण्याकडून मारहाणीची खोटी माहिती । वारंवार कॉल करून पोलिस प्रशासनाला दिला त्रास

**अकोले । वीरभूमी-**

तालुक्यातील वाघापूर येथील एका तरुणाने दारूच्या नशेत रात्रीच्या वेळी ११२ डायल क्रमांकावर वारंवार कॉल करून खोटी माहिती देत पोलिसांची दिशाभूल केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी रोहिदास गोरक्षनाथ बर्डे (वय ३६) याच्याविरुद्ध बी.एन.एस. कलम २१२ तसेच मुंबई प्रोहिबिशन ॲक्ट ८५(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस कॉन्स्टेबल मनोहर अशोक मोरे हे अकोले पोलीस ठाण्यात दि. १५ मे २०२६ रोजी ड्युटीवर असताना रात्री ९.२६ वाजण्याच्या सुमारास वाघापूर येथील रोहिदास बर्डे याचा चऊढ वर कॉल आला. त्यावेळी त्याने पत्नी व मेव्हणे मारहाण करून शिवीगाळ करत असल्याची माहिती दिली.

या कॉलची तात्काळ दखल घेत पो.कॉ. मोरे यांनी बर्डे याला संपर्क केला असता तो मोठ्याने आरडाओरडा करत सहा महिन्यांपूर्वी पत्नीविरोधात दिलेल्या तक्रारीबाबत विचारणा करू लागला. त्यावेळी मोरे यांनी संबंधित तक्रारीचा तपास पो.हे.कॉ. देशमुख यांच्याकडे असून त्यांच्याशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. मात्र, बर्डे हा ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने याबाबत अहिल्यानगर ११२ कंट्रोलला माहिती देऊन कॉल क्लोज करण्यात आला.




त्यानंतरही बर्डे हा वारंवार ११२ वर कॉल करत असल्याने रात्री १.२५ वाजता पो.स.ई. घोडे, पो. कॉ. गोरे यांच्यासह पो.कॉ. मोरे हे शासकीय वाहनाने वाघापूर येथे गेले. तेथे रोहिदास बर्डे हा मारुती मंदिराच्या पाठीमागे उभा असल्याचे दिसून आले. पोलिसांना पाहताच त्याने आरडाओरडा सुरू करून मी फाशी घेईन अशी धमकी दिली.

यावेळी पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत पंचनामा करून त्याला ताब्यात घेत अकोले येथे आणले. ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली असता त्याने अमली पदार्थाचे सेवन केल्याचा अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला. तपासात त्याने केलेले सर्व कॉल खोटे असून दारूच्या नशेत पोलिस प्रशासनाला त्रास देण्याच्या उद्देशाने वारंवार ११२ वर संपर्क केल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी पो.कॉ. मनोहर अशोक मोरे यांच्या फिर्यादीवरून अकोले पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३०५/२०२६ अन्वये बी.एन.एस. कलम २१२ व मुंबई प्रोहिबिशन ॲक्ट ८५(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# 'अकोल्यातील आदिम ग्रंथालय वाचन, लेखन संशोधनाचे केंद्र बनावे'

## आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते ग्रंथालयाचे उद्घाटन

**अकोले । वीरभूमी-**

मोबाईल आणि डिजिटल मनोरंजनाच्या वाढत्या प्रभावाच्या काळात आदिवासी समाजातील तरुण शिक्षकांनी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन वाचन, चिंतन आणि सांस्कृतिक जतन संवर्धनाची चळवळ उभी केली आहे. सह्याद्री कोळी महादेव सांदण परिवार प्रतिष्ठानच्या कार्यालयासह 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालयाचे रविवारी अकोल्यात उद्घाटन झाले. हे ग्रंथालय आदिवासी समाजाच्या इतिहास, लोकपरंपरा, भाषा, कला, निसर्गपूरक जीवनशैली आणि पूर्वजांच्या ज्ञानपरंपरेचे जतन व संशोधन करणारे केंद्र म्हणून हे विकसित व्हावे, अशी अपेक्षा विविध वक्त्यांनी बोलून दाखवली केली.

सांदण परिवार प्रतिष्ठानच्या कार्यालयाचे तसेच 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालय' उद्घाटन आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. इतिहास संशोधक प्रा. डॉ. विलास गवारी, शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर, सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. नितीन तळपाडे, लेखक पी. सी. झांबाडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक व लेखक राजू ठोकळ अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमात आदिवासी कला, संस्कृती, भाषा, इतिहास, निसर्ग संवर्धन आणि निसर्गपूरक जीवनशैली या विषयांवर औचित्यपूर्ण चर्चा करण्यात आली. मोबाईलच्या युगात लहान मुले, तरुण तासन्तास रील्स, कॉमेडी व्हिडिओ आणि डिजिटल मनोरंजनात गेमिंगमध्ये गुंतून राहत असताना आदिवासी समाजातील तरुण शिक्षकांनी सांदण परिवारच्या माध्यमातून वाचन, चिंतन आणि समाजाच्या जीवनशैलीविषयी अभ्यासमंथनाची चळवळ सुरू केली आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

'आदिम ग्रंथालय' हे केवळ पुस्तकांचे संग्रहालय न राहता आदिवासी महादेव कोळी समाजातील पूर्वजांचे अनुभव, लोकपरंपरा, ज्ञान आणि सांस्कृतिक वारसा यांचे जतन, संवर्धन व संशोधन करणारे केंद्र बनावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. शाळाशाळांमधून विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार करण्याची गरज यावेळी प्रतिपादन करण्यात आली.

आदिवासी संस्कृती ही निसर्गकेंद्री असून जंगल, डोंगर, नदी, पाऊस आणि शेती यांच्याशी आदिवासी समाजाचे अद्वैत नाते सांगताना आदिवासी भागातील शाळाशाळांमध्ये उत्तम वाचनालये उभी करणे, शाळा भौतिकदृष्ट्या समृद्ध करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली जोपासणे याची आवश्यकता वक्त्यांनी अधोरेखित केली.

दरवर्षी उन्हाळ्यात अकोले तालुक्यातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये मोठ्या प्रमाणावर डोंगरांना आग लावली जाते. त्यामुळे जैवविविधतेचे अपरिमित नुकसान होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. या संदर्भात जनजागृती आणि संवेदनशीलता निर्माण करण्याची गरज मान्यवरांनी अधोरेखित केली.

यावेळी आदिवासी समाजातील पराक्रमी व्यक्तिमत्त्वे राघोजी भांगरे, रामा




किरवा आणि लक्ष्मण खाडे यांच्यासह इतरांच्या चरित्रांचे पुस्तक स्वरूपात प्रकाशन वाचनालयाच्या माध्यमातून करण्यात यावे, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

यावेळी विश्वनाथ चौधरी, केशव भांगरे, रवी रुपवते, सुभाष बगनर, बाळू खाडे, राजेंद्र सदगीर, गोरख देशमुख, आण्णासाहेब आभाळे उपस्थित होते. सोमनाथ कातडे यांनी प्रास्ताविक केले सूत्रसंचालन विकास साबळे यांनी केले. संजय गोडे यांनी आभार प्रदर्शन केले.

नवोदय व विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. ५३६४ मीटर उंचीवरील एव्हरेस्ट बेस कॅम्प सर करणाऱ्या मनस्वी बांडे व आई वैशाली बांडे या मायलेकींचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांदण परिवाराचे संस्थापक अध्यक्ष संजय गोडे, मनोहर भांगरे, बबन बांबेरे, प्रशांत गवारी, विठ्ठल बांगर, कैलास सारोक्ते, सिताराम बेंडकोळी, सिताराम बांडे, यशवंत पारधी, भिमराज कडाळी, लक्ष्मण घोटकर, अशोक इरनक, प्रविण भांगरे, महेंद्र देशमुख, अनिल देशमुख, विशाल कुंदे, गणेश शिंदे, रोहिदास डगळे, किरण डगळे, संतोष घिगे, संध्या बांबळे, अनिल भांगरे, मधुकर भांगरे, आबासाहेब गोंदके, धनंजय झडे, मछिंद्र शेळके, प्रविण खाडे, एकनाथ खाडे, तुळशीराम बांबळे, विजेंद्र साबळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.